# आयुष्याच्या वाटेवर .....




आयुष्याच्या वाटेवर  चालताना,
दु:ख येतात प्रत्येकाला
पाहिलयं मी व्यक्त होताना, मित्र
– मैत्रिणी अन नातेवाईकांना

विषय आहे हा, कधीच न
संपनारा....
जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला,
सामोरं जाव लागत याला,

माणूस करतो वणवण सुखासाठी
फक्त....
व्देष, शत्रुत्व, अपयश, गरीबी मूळ
आहे दु:खाचं

प्रेम,मित्रत्व, यश, संपत्ती, मूळ
आहे सुखाचं
माणूस धावतो सुखाच्या पाठी, तरी
दु:ख येतात गाठी

काम, क्रोध, मोह, माया, मद, हे
अवगुण अज्ञानी जणांचं
सत्य, सत्व, विवके, नम्रता, हे
सद्गुण ज्ञानी जणांचं

ज्ञान – अज्ञान, सुख – दु:ख,
यातील अंतर सारखचं
अज्ञानी कधी नसतो सुखी, कारण
दु: ख असतं त्याचे मनी

हे सार कशामुळे ? तर सद्गुण
दुर्गुणांच्या अस्तित्वामुळं
आयुष्याच्या वाटेवर चालताना,
सुखासाठी एकच उपाय
दुर्गुणांचा नाश करा,अन् सदगुण
अंगिकारा...

कु.वैष्णवी दिपक जाधव
व्दितीय वर्ष – विज्ञान